# शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी
## वसतिगृहात राहण्यासंबधीचे नियम

1. वसतिगृहात स्वयंपाक / चहा करता येणार नाही. तसेच बाहेरचा जेवणाचा डबा आणता येणार नाही. तसेच विदयार्थ्यांना मेस चालू असल्यास मेसमध्येच जेवण घेणे बंधनकारक राहील.
2. मुलांच्या वसतिगृहात रात्री 9.00 वाजण्यापूर्वी हजर राहणे आवश्यक आहे व रात्री 9.00 वा. नंतर वसतिगृहात प्रवेश दिला जाणार नाही. तसेच मुलींच्या वसतिगृहात रात्री 7.30 वाजण्यापूर्वी हजर राहणे आवश्यक आहे व रात्री 7.30 वा. नंतर वसतिगृहात प्रवेश दिला जाणार नाही.
3. वसतिगृहाच्या खोलीतील शासकीय मालमत्ता पलंग, खुर्च्या, टेबल, रॅक, विजेचे स्वीच प्लग होल्डर, टयूबलाईट, दरवाजे, खिडक्या व वसतिगृहातील इतर शासकीय मालमत्ता यांचा व्यवस्थितरित्या वापर करणे प्रत्येक विदयार्थ्याचे कर्तव्य आहे. त्याबाबत काही मोडतोड झाल्यास संबधित वस्तूची रक्कम विदयार्थ्याकडून वसूल करण्यात येईल. तसेच संबंधित विदयार्थी शिक्षेस पात्र राहील.
4. वसतिगृहात गैरवर्तन अथवा शांतताभंग करण्याचे कोणतेही कृत्य करण्यास सक्त मनाई आहे.
5. वसतिगृहात नशापाणी / मद्यपान व धुम्रपान करणेस अथवा करुन येणेस सक्त मनाई आहे.
6. वसतिगृहात बाहेरचे कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करण्यास अथवा राहण्यास सक्त मनाई आहे.
7. वसतिगृहातील विदयार्थ्यांना वसतिगृह प्रमुखांचे परवानगीशिवाय घरी जाता येणार नाही.
8. वसतिगृहात विजेचा वापर व पाण्याचा वापर काटकसरीने करावा. पाणी उपलब्धतेनुसार मिळेल याची नोंद घ्यावी.
9. वसतिगृहात फटाके व स्फोटक पदार्थ बाळगण्यास सक्त मनाई आहे.
10. वसतिगृहात विजेचे उपकरण उदा. शेगडी, हिटर इस्त्री, रेडिओ, टेप इ. वापर करण्यास सक्त मनाई आहे. तसेच वसतिगृहातील विजेमध्ये बिघाड झाल्यास वसतिगृह प्रमुख यांच्या निदर्शनास आणावे. वसतिगृह व वसतिगृहातील परिसरात स्वच्छता राखावी. ज्या विंगमध्ये अस्वच्छता असेल त्यामधील विदयार्थ्यांना जबाबदार धरले जाईल.
11. वसतिगृहातील विदयार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश देते वेळी त्यांना त्यांच्या नावासमोर दिलेले फर्निचर परस्पर बदलता येणार नाही. तसे आढळून आल्यास संबंधित विदयार्थी शिक्षेस पात्र राहील.
12. विदयार्थ्यांचे आनंदोत्सव उदा. गॅदरिंग, निवडणुक, होळी, रंगपंचमी, हॉस्टेल डे हे शांततेने शासकीय मालमत्तेचे नुकसान होणार नाही. याची दक्षता घेऊन साजरे करण्यास हरकत नाही. त्यासाठी वरिष्ठांची परवानगी घेणे आवश्यक आहे. याशिवाय वेळोवेळी करण्यांत येणारे नियम व वसतिगृह प्रमुखांनी दिलेल्या सूचना विदयार्थ्यावर बंधनकारक राहतील.

वरील नियमांचा भंग केल्यास कोणतीही पुर्वसूचना न देता विदयार्थ्यांना वसतिगृहाबाहेर काढण्यात येईल.

-----------------------------------------------------------------------------------------------

**प्रतिज्ञापत्र**

उपरोक्त सर्व नियम व अटी मला व माझ्या पाल्यास मान्य आहेत. यातील कोणत्याही एका नियमाचे उल्लंघन झाल्यास माझा पाल्य काहीही पूर्व सूचना न देता वसतिगृहातून काढून टाकण्यास पात्र राहील याची मला पूर्ण जाणीव आहे.

विदयार्थ्याची सही : पालकांची सही :

नाव : कायमचा पूर्ण पत्ता (दूरध्वनी क्रमांकासह)

पत्ता :